थोडक्यात

## मध्यम पावसाची शक्यता

**नाशिक ।** जिल्ह्यात १५ ते १९ ऑक्टोबर दरम्यान तुरळक हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आकाश पुढील पाच दिवस अंशतः ढगाळ राहील, असा अंदाज महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या इगतपुरी विभागीय कृषी संशोधन केंद्राने वर्तवला आहे. नैऋत्य मोसमी पावसाने देशाच्या ९५ टक्के भागातून परतीचा प्रवास पूर्ण केला आहे. दोन दिवसांत उर्वरित ५ टक्के भागातून तो पूर्णपणे बाहेर पडेल, अशी शक्यता आहे. ऑक्टोबरच्या उर्वरित काळात महाराष्ट्रात रब्बी पिकांना लाभदायक ठरेल, असा मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे. दि. १५ ते २० ऑक्टोबरदरम्यान ढगाळ वातावरणासह तुरळक ठिकाणी मध्यम ते किरकोळ पावसाची शक्यता आहे. गुरुवारी (दि.१६) जळगाव, धुळे, नाशिक, अहिल्यानगर, पश्चिम आणि पूर्व छत्रपती संभाजीनगर, शुक्रवारी (दि.१७) धुळे, नाशिक, सह्याद्री घाटमाथा, तसेच रविवार-सोमवार (दि.१९-२०) सह्याद्री घाटमाथा, नाशिक, अहिल्यानगर पावसाची शक्यता आहे. हा पाऊस रब्बी पिकांसाठी लाभदायक ठरेल, असे हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले.

# सुर्वेंचे भाषामिश्रण विलोभनीय : डॉ. धोंडगे

## संमेलन समारोप; सुर्वेंच्या साहित्यावर चर्चासत्र

**नाशिक । प्रतिनिधी**

कविवर्य नारायण सुर्वे यांच्या भाषा आणि लिखाणात वेगळेपण असल्याचा पैलू उलगडत साहित्यिक प्रा. डॉ. दिलीप धोंडगे यांनी भाषा, रचना बंधाचे भिन्न रूप मांडले. मनस्वी कविता लिहिणाऱ्या सुर्वेंचे भाषा मिश्रण विलोभनीय वाटते, असे नमूद केले.

नारायण सुर्वे जन्मशताब्दीनिमित्त झालेल्या साहित्य संमेलनात 'नारायण सुर्वे यांचे साहित्य' या विषयावर चर्चासत्र झाले. डॉ. धोंडगे अध्यक्षस्थानी होते. ङमराठी साहित्यात नारायण सुर्वे यांच्या कवितांचे स्थान' हा विषय त्यांचा होता. प्राचार्य डॉ. दिलीप पवार, प्रा. डॉ. शशिकला राय, सायमन मार्टीन यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला.

**कष्टकरी काव्यविश्वात : डॉ. पवार**

सुर्वे यांच्या 'कवितांतील कामगारविश्व' या विषयावर प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांनी मनोगत व्यक्त केले. सुर्वे जगत आले, तसे शब्द त्यांच्या साहित्यात आहेत. ते भूमिकेशी एकनिष्ठ राहिले. कष्टकऱ्यांना त्यांनी काव्यविश्वात आणले. श्रमिकांचा जीवन अनुभव सुर्वेंनी घेतला. त्यामुळे त्यांच्या कवितेत मार्क्सवाद दिसतो.

**सुर्वे महिलांच्या विश्वात : डॉ. राय**

महिला वास्तवाच्या जवळ असतात. म्हणून साहित्यात महिलांना स्थान देतो, असे सुर्वे म्हणायचे. ते महिलांच्या विश्वात राहिले. सुर्वेंनी जीवन सांगितले. सुर्वे पुढचे पाहून साहित्यात मांडत असत. महिलांचे दुःख त्यांना समजले. त्यांनी माणसांना समजून घेतले, असे प्रा. जे. राय यांनी सांगितले. डॉ. राय यांनी 'नारायण सुर्वे यांच्या कवितेतील महिलांचे विश्व' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला.

**कवितांतून समाजाचे चरित्र : मार्टीन**

साम्यवाद म्हटलावर समता, संघर्ष निश्चित आहे. आता मात्र समता, संघर्ष स्वातंत्र्याची भाषा करता येते का? असा प्रश्न उपस्थित केला. 'नारायण सुर्वे यांच्या कवितेतील साम्यवाद' या विषयावर बोलताना मार्टीन म्हणाले की, सत्तेचा सोपान चढण्यासाठी भ्रम पसरवला जात आहे. जातींमध्ये विरोध वाढला आहे. जगभर उदारमतवादाला ग्रहण लागले आहे.

स्वागताध्यक्ष डॉ. विशाल जाधव यांनी स्वागत केले. तल्हा शेख यांनी सूत्रसंचालन केले. फ्रान्सीस वाघमारे यांनी आभार मानले.




### नाशिकमध्ये मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन

नाशिकमध्ये ९,१०, ११ जानेवारी २०२६ ला अखिल भारतीय मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन होत आहे. सायमन मार्टीन अध्यक्षस्थानी असतील.


### सुर्वे संमेलनाचे अध्यक्ष झाले याचा आनंद : शिंदे

**नवीन नाशिक ।** रस्त्यावर सापडलेले सुर्वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले याचा मला अधिक आनंद आहे. मुळातच, सुर्वे साहित्याच्या माध्यमातून विचारांचा वारसा घेऊन जगभर पोहोचले, असे गौरवोदगार माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे काढले.

कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जनशताब्दीनिमित्त झालेल्या साहित्य संमेलनाचे उदघाटन माजी मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे अध्यक्षस्थानी होते. सिडकोतील कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालयात सुर्वे यांच्या प्रतिमेला सुशीलकुमार शिंदे यांनी अभिवादन केले. झेप या सुर्वेंच्या कवितेचे वाचन त्यांनी केले. स्वागताध्यक्ष डॉ. विशाल जाधव, वाचनालयाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे उपस्थित होते. वाचनालयाचे विश्वस्त राजू देसले यांनी प्रास्तविक केले. साहित्य संमेलनाने सुर्वे यांच्या जनशताब्दीची सुरुवात होत असून वर्षभर कार्यक्रम होतील असे सांगून देसले यांनी सुर्वे यांचा विचार पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल असे स्पष्ट केले. सुर्वेंच्या जीवनपट चित्रफितीचे तल्हा शेख यांनी सादरीकरण केले. कवी रविकांत शार्दुल यांनी सूत्रसंचालन केले. वाचनालयाचे सचिव राजू नाईक यांनी आभार मानले.



# नक्षलींचे ऐतिहासिक आत्मसमर्पण



**गडचिरोली । वृत्तसंस्था**

दंडकारण्यातील माओवादी चळवळीचा वरिष्ठ नेता व पॉलिट ब्युरो सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल ऊर्फ भूपती ऊर्फ सोनू याच्यासह एकूण ६१ जणांनी मंगळवारी गडचिरोली पोलिसांपुढे शरणागती पत्करली. मुख्यमंत्री व पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर बुधवारी सकाळी ११ वाजता या सर्वांनी आत्मसमर्पण केले.

माओवाद्यांच्या गणवेशात भूपतीने आपल्याकडील शस्त्र मुख्यमंत्र्यांकडे सोपविले, मुख्यमंत्र्यांनी त्याच्या हाती संविधान देऊन त्याचे स्वागत केले. तीन दशके माओवाद्यांच्या अगणित हिंसक कारवायांचा रणनीतीकार राहिलेल्या भूपतीच्या चेहऱ्यावर आत्मसमर्पणावेळी हास्य, समाधान होते, हस्तांदोलनानंतर मुख्यमंत्र्यांनी त्याच्याशी संवाद साधला.

# अभिनेते पंकज धीर कालवश

**मुंबई । वृत्तसंस्था**



बी. आर. चोप्रा यांच्या 'महाभारत' मालिकेत कर्णाची अजरामर भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते पंकज धीर (६८) यांचे बुधवारी निधन झाले.त्यांच्या निधनाची माहिती त्यांचे जुने मित्र अभिनेता अमित बहल यांनी दिली.

पंकज धीर यांना काही काळापूर्वी कर्करोग झाल्याचे निदान झाले होते. त्यांनी त्या आजारावर यशस्वीपणे मात केली होती. मात्र, काही महिन्यांपूर्वी कर्करोगाचे पुन्हा निदान झाले आणि यावेळी त्यांची प्रकृती सतत खालावत गेली.उपचारादरम्यान मोठ्या शस्त्रक्रियेचाही त्यांना सामना करावा लागला. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, पण दुर्दैवाने त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

पंकज धीर हे केवळ टीव्हीपुरतेच मर्यादित नव्हते. त्यांनी 'सडक', 'सोल्जर', 'बादशाह' यांसारख्या अनेक गाजलेल्या हिंदी चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारल्या. त्यांचा भारदस्त आवाज, व्यक्तिमत्त्व आणि अभिनयाची सहजता यामुळे ते प्रत्येक भूमिकेत उठून दिसत असत.१९८८ मध्ये प्रसारित झालेल्या बी. आर. चोप्रा यांच्या 'महाभारत' या ऐतिहासिक मालिकेमुळे पंकज धीर घराघरात पोहोचले. कर्णाची न्यायप्रिय, तेजस्वी आणि भावनिक बाजू त्यांनी प्रभावीपणे साकारली, ज्यामुळे प्रेक्षकांच्या मनात त्यांचे अढळ स्थान निर्माण झाले. आजही त्यांची ती भूमिका लोकांच्या स्मरणात ताजी आहे.

# सुर्वेंच्या कवितेतील डौल आकर्षक : पाटील

**नाशिक ।** कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कवितेत नाट्य आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेतील रंगमंचीय डौल आकर्षित करतो, असे प्रतिपादन नाटककार दत्ता पाटील यांनी केले.



सुर्वे साहित्य संमेलनाची सांगता नारायण सुर्वे यांच्या निवडक कविता वाचनाने झाली. अध्यक्षस्थानी पाटील होते. त्यावेळी ते बोलत होते. नाटक पाहतोय या पद्धतीने सुर्वेंच्या कविता ऐकताना अदृश्य रंगमंच तयार होतो. सुर्वेंच्या कविता नीट वाचाव्यात, नीट आकलन करावे. सुर्वेंचा आवाज आठवावा. सुर्वेंची कविता सादर करण्याची शैली होती, असे पाटील म्हणाले. श्रमयुग ते भ्रमयुग असा प्रवास घडला आहे. चेहरा नसलेला झुंडीच्या युगात आपण वावरत आहोत. अशा काळात सुर्वेंची कविता आपणाला जगायला बळ देते, असेही पाटील यांनी सांगितले.कवी जीवाजी वाघमारे यांनी 'मनीआर्डर' ही कविता सादर केली. इप्टातर्फे 'डोंगरी शेत माझ गं, तेव्हा एक कर' ही कविता सादर करताना उपस्थितांनी चालीवर ठेका धरला. कवींनी सादर केलेल्या सुर्वेंच्या कविता अशा : रविकांत शार्दूल (गिरणीची लावणी), अरुण घोडेराव (माझी आई), नागेश धुर्वे (कार्ल मार्क्स), सल्लान राठोड (चार शब्द) डॉ. मनीषा जगताप (दोन दिवस), स्मीता पानसरे (तुमचंच नाव लिया), प्रा. शोभा बागूल (शीगवाला), अपूर्व इंगळे (ऐसा गा मी ब्रम्ह), लता कांबळे (सूर्यकुलातील कवी), तल्हा शेख (स्वतःलाच रचित गेलो), प्रसेनजित गायकवाड (निघा रे सत्वर). तसेच सुर्वे यांच्यावरील कवितेचे वाचन डॉ. प्रशांत आंबरे, प्रा. डॉ. शकुंतला चव्हाण यांनी केले. डॉ. आंबरे यांनी आभार मानले.

# भुजबळ यांचा वाढदिवस हजारो ग्रंथभेटीने सुफळ संपूर्ण

## 'ज्ञानोत्सवा'स माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची उपस्थिती; शुभेच्छारुपी ग्रंथ वाचनालयांना देणार

**नाशिक । प्रतिनिधी**



अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांच्या ७८ व्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित ज्ञानोत्सवास राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील दिग्गजांनी उपस्थिती लावत मंत्री भुजबळ यांचे अभीष्टचिंतन केले. या ज्ञानाच्या भेटी उत्सवानिमित्ताने राज्यभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, हितचिंतकांकडून हजारोंच्या संख्येने पुस्तके भेट स्वरूपात मंत्री भुजबळ यांना देण्यात आली. त्यामुळे यंदाचा त्यांचा वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा कार्यक्रम न राहता ज्ञान आणि संस्कारांचा उत्सव ठरला.

वाढदिवसानिमित्त शुभेच्छा म्हणून फुले, गुच्छ व इतर भेट वस्तू न देता पुस्तके द्यावीत, असे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनास राज्यभरातील हितचिंतकांनी मोठा प्रतिसाद दिला. त्यामुळे आजचा हा 'ज्ञानोत्सव' अतिशय अविस्मरणीय ठरला. नाशिक भुजबळ फार्म येथील कार्यालयात राज्यभरातील हितचिंतकानी मोठ्या प्रमाणात शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली. यावेळी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. मुख्यमंत्री सहायता निधीसाठीदेखील मदत सुपूर्त करण्यात आली.

कार्यक्रमास आमदार दिलीप बनकर, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार हिरामण खोसकर, आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार वसंत गिते, सुधीर तांबे, माजी महापौर विनायक पांडे, अशोक मुर्तडक, मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे, ईश्वर बाळबुधे, अंबादास बनकर, आगरी समाजाचे अध्यक्ष राजाराम पाटील, डॉ.कैलास कमोद, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, पंढरीनाथ थोरे, आनंद सोनवणे, अरुण थोरात, प्रा.दिवाकर गमे, बाळासाहेब कर्डक, जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार, विष्णूपंत म्हैसधुणे, नाशिक म्हाडाचे विभागीय अध्यक्ष तथा शहराध्यक्ष रंजन ठाकरे, अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य हुसेन शेख, के.के.वाघ शिक्षण संस्थेचे अजिंक्य वाघ, नानासाहेब महाले,राजेंद्र डोखळे, वसंत पवार, माजी नगरसेवक लक्ष्मण जायभावे, जगदीश पवार, मंजिरी धाडगे, प्रेरणा बलकवडे, योगिता आहेर, गोरख बोडके, सुनील मोरे, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, समाधान जेजुरकर, मनोज घोडके, डॉ.योगेश गोसावी, संजय करंजकर, राजेंद्र शिंदे, उदय जाधव, प्रा.बाळासाहेब पिंगळे, योगेश निसाळ, प्रा.ज्ञानेश्वर दराडे, मोहन शेलार, डॉ.नागेश गवळी, प्रा.अर्जुन कोकाटे, वसंत खैरनार, प्रित्येश गवळी, पंढरीनाथ बनकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य लोणारी समाजाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.सुदर्शन घेरडे यांनी १०० किलो वजनाच्या पुस्तकांची भेट दिली.

## बिहार विधानसभा निवडणूक

### प्रशांत किशोर यांची माघार

**पाटणा ।** निवडणूक रणनीतिकार आणि जन सुराज पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी आगामी विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या व्यापक हिताचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. किशोर यांनी म्हटले की, जर मी स्वतः निवडणूक लढलो, तर पक्षाकडे लक्ष देता येणार नाही.माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत प्रशांत किशोर म्हणाले, मी विधानसभा निवडणूक लढवू नये, असे पक्षानेच ठरवले आहे. त्यामुळेच राघोपुर मतदारसंघातून तेजस्वी यादवांविरोधात दुसरा उमेदवार देणार आहोत. हा निर्णय पक्षाच्या एकूण फायद्यासाठी घेतला आहे. जर मी निवडणूक लढलो असतो, तर माझे लक्ष संघटन आणि तयारीपासून विचलित होईल.

### चिराग पासवानांना नितीश कुमारांचा झटका

**पाटणा ।** नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडने ५७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या पहिल्याच यादीतून नितीश कुमारांनी चिराग पासवान यांना स्पष्ट मेसेज दिला आहे. एनडीएचे घटक पक्ष असलेल्या दोन्ही पक्षातील सुप्त संघर्ष यानिमित्ताने समोर आला आहे. नितीश कुमारांच्या जेडीयूने चिराग पासवान यांनी दावा केलेल्या चार जागांवर आपले उमेदवार जाहीर करून टाकले आहेत. जेडीयूने बिहार विधानसभा निवडणुकीसाठी पहिली यादी जाहीर केली आहे. या चार मतदारसंघातून आपण उमेदवार उतरवणार असल्याचे चिराग पासवानांनी जाहीर केले होते.

### भाजपच्या दुसऱ्या यादीत १२ उमेदवार

**पाटणा ।** बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने १२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. दुसऱ्या यादीत मैथिली ठाकूर यांच्या नावाचाही समावेश आहे. मैथिली ठाकूर या दरभंगा जिल्ह्यातील अलीनगर विधानसभा मतदारसंघातून लढणार आहे. भाजपने बक्सर विधानसभा मतदारसंघातून आयपीएस अधिकारी आनंद मिश्रा यांना उमेदवारी दिली आहे. भाजपने पहिल्या यादीत ७१ उमेदवारांची नावे जाहीर केली होती. दुसऱ्या यादीत १२ उमेदवार असून, मैथिली ठाकूर यांच्या पक्षप्रवेशानंतर ही यादी जाहीर करण्यात आली आहे.

## खान्देश वृत्त

### डंपरने चिरडले; दोघांचा मृत्यू

**शिंदखेडा ।** दीपोत्सवाला सुरुवात होत असताना हायवा काळ बनून आला. सुसाट हायवा डंपर बसस्थानकात घुसला. या डंपरने पाच जणांना चिरडले. त्यात महिलेसह दोघे जागीच ठार झाले. एक जण मृत्यूशी झुंज देत आहे.त्याला नाशिकला हलविण्यात आल्याचे समजते. तर इतर दोघांवर धुळे जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. बुधवारी सकाळी शिंदखेडा तालुक्यातील खलाणे गावात ही दुर्घटना घडली. या अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी अपघाताला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाईची मागणी करत मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका घेतली. पोलिसांनी या प्रकरणी हायवा चालकाला ताब्यात घेतले आहे.

### तृतीयपंथीय जितूच्या हद्दपारीचा प्रस्ताव

**जळगाव ।** येथील समता नगर मधील तृतीयपंथीय जितू उर्फ जितू ज्योती जॉन (वय ३३) याचा जळगाव जिल्ह्यातून हदपारीचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी जितेंद्र पाटील यांनी पारीत केला आहे.याबाबत जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तसेच भुसावळ उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर तृतीयपंथीय शमीबा पाटील, आम्रपाली उर्फ अशपाक बागवान व इतरांनी उपोषण सुरू केले होते. किन्नर जितू काही लोकांच्या सहकार्याने मारहाण करून त्रास देत असून जीवे मारण्याची धमकी देत असल्याचे तक्रारीत नमूद केले होते.

### मुलाचे अपहरण करून मारहाण

**भुसावळ ।** तालुक्यातील कन्हाळा गावातील अवघ्या १६ वर्षीय निसार युनुस गवळी या मुलाचे खडका येथील गुंड प्रवृत्तीच्या टोळीने अपहरण करून जबर मारहाण केल्याची धक्कादायक घटनासमोर आली आहे. या मुलाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे समजते. ही घटना बुधवारी सकाळी ११.३०वाजेच्या सुमारास घडली.घटनेचे सीसीटिव्ही फुटेज प्रशासनापर्यंत पोहचले आहेत.पोलीसांनी घटनास्थळी भेट दिली असून दवाखान्यात सदर युवक बोलण्याचा मन:स्थितीत नसल्याने जबाब घेता आला नाही. मारहाण कोणत्या कारणाने झाली याबाबत तपास सुरू आहे. या प्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


## क्लासिफाईड/सुपरमार्केट

### पाहिजेत

**ना.रोड** येथे कन्स्ट्रक्शन साइटवर फ्लॅट दाखवण्या करीता हुशार मुलगी पाहिजे पात्रता ग्रॅज्युएट मो. 8208468934 (19/10-BK-6022)

### भाड्याने देणे

**अशोकस्तंभ,** घरपुरे घाटावरील रिव्हर व्ह्यू बिल्डींगमध्ये तळमजला (४०.२५ स्क्वे. मीटर) व ग्राऊंड फ्लोअर (३७.३६ स्के. मीटर) चे तीन शॉप भाड्याने देणे आहे. 8975839835 (BK-5931)

**ऋषिराज** रिजन्सी अपार्टमेंटमधील ५ वा मजला, विद्या विकास सर्कल, नाशिक ३०६.७० स्के. मी. + ३ कार पार्किंग भाड्याने देणे आहे. 8975839835. (BK-5933)

**ऋषिराज** रिजन्सी अपार्टमेंटमधील ५ वा मजला, विद्या विकास सर्कल, नाशिक १३८.४५ स्के. मी. + २ कार पार्किंग, ४७.३८ ओपन टेरेस भाड्याने देणे आहे. 8975839835 (BK-5932)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... ✽ व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : ✽ व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... ✽ (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

### व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

### जाहिराती




### सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/CRG00556)

### नावात बदल

**My** old name MAHEJABIN IQBAL SHAIKH has been changed to my new name JABIN SALIM PANSARE as per Aadhar No. 8978 4814 8787. (BK-6023)

**My** old Name Kazi Safiya Begum has been changed to new Name Kazi Safia Begum as per Aadhar No.7787 0399 2293. (CM-721)

**माझे** जुने नाव सुमन वामन डामरे असे होते आता माझे नवीन नाव कविता हरिशचंद्र अहिरे असे आहे. आधार क्रमांक 765574342449. (CM-722)

**My** old name Ojas Saju Sahadevan has been changed to new name Ojas Saju as per Aiffdavit No. 55AB 282756, Dated : 15.10.25. (16/10)

: जाहिरात दर :
◆ क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्वेअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.) ◆ ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १६/- प्रतिशब्द ◆ ३+१ फ्री ◆ क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री ◆ कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द ◆ हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस) ◆ पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

### वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


### कालचे कांदा भाव

| | आवक (क्विं.) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| पिंपळगाव | १७९०० | ७०० | १५६० | ११०० |
| विंचूर | १४८९५ | ४०० | १४०० | १०४० |
| निफाड | ५८६५ | ४०० | १२१० | १०५० |
| सायखेडा | ५७४० | ७०० | १४६१ | १०५० |

## निधन वार्ता



### सुनीता कपोते

**नाशिक ।** येथिल रहिवासी सुनीता बाळकृष्ण कपोते (५५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा व मुलगी आहेत. बाळकृष्ण कपोते यांच्या त्या पत्नी होत.



### सुशिलाबाई मत्सागर

**कसबे सुकेणे।** मौजे सुकेणे (ह.मु.नाशिक) सुशीलाबाई दिनकर मत्सागर (७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, पाच मुली, सुन व नातवंडे असा परिवार आहे. सदानंद मत्सागर यांच्या त्या मातोश्री होत.



### मंदाकिनी रघुवंशी

**नाशिक ।** ज्येष्ठ स्वाध्यायी गंगापूर रोड येथील रहिवासी मंदाकिनी जगदीश रघुवंशी (८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चार दशकांपूर्वी गंगापूर रोड परिसरात महिलांसाठी स्वाध्याय सुरू करण्यात त्यांचे योगदान होते.



### किशोर हिरे

**मालेगावं।** तालुक्यातील निमगावं येथील रहिवासी व इरिगेशनचे सेवानिवृत्त कर्मचारी किशोर भिला हिरे (९४) हल्ली रा. सटाणा यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पश्चात मुलगा, ३ मुली, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. आदिवासी सेवा समिती चे सेवानिवृत्त शिक्षक राजू हिरे यांचे ते वडील होतं.



### बाळकृष्ण लिलके

**नाशिक ।** पंचवटी, तपोवन येथील रहिवासी, चांदवड महसूल विभागात नायब तहसीलदार पदावर कार्यरत बाळकृष्ण दत्तात्रेय लिलके (५७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, आई-वडिल, भाऊ-बहिण असा परिवार आहे.